जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 SEP 2019
तरुण भारत



# पूरग्रस्त विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्राचे परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. पूरग्रस्त महाविद्यालयांना अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. असा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने पूरबाधित विद्यार्थी आणि महाविद्यालये यांना दिलासा देणारे निर्णय घेतले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२०च्या प्रथम सत्राचे परीक्षा शुल्क माफ करणार. पुरामुळे ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे खराब अथवा गहाळ झाली आहेत त्यांना मागणी केल्यास दुबार पदवी प्रमाणपत्रे आणि विद्यापीठाशी निगडित इतर शैक्षणिक कागदपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेतला आहे.

**एक दिवसाचे वेतन पूरग्रस्तांसाठी**

विद्यापीठाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन पूरग्रस्तांना दिले आहे. ही रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 SEP 2019
लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाकडून पूरबाधित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पूरबाधित विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षात प्रथम सत्र परीक्षा शुल्कमाफी, बाधित महाविद्यालयांना अर्थसाह्य आदींसह महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असल्याची माहिती शुक्रवारी देण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने पूरबाधित विद्यार्थी आणि महाविद्यालये यांना दिलासा देणारे निर्णय घेतले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पूरबाधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२०च्या प्रथम सत्राचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पुरामुळे ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे खराब अथवा गहाळ झाली आहेत त्यांनी पुन्हा मागणी केल्यास दुबार पदवी प्रमाणपत्रे आणि विद्यापीठाशी निगडित इतर शैक्षणिक कागदपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेतला आहे. कार्यक्षेत्रातील सुमारे बारा महाविद्यालयांचे पुरामुळे मोठे नुकसान झाले.

या महाविद्यालयांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून मदत मिळण्यासाठीचे प्रस्ताव पाठवले जाणार आहेत .विद्यापीठाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ऑगस्ट मधील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देण्यात आल्याची माहिती कु लगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 SEP 2019
तरुण भारत

# शिव सहाय्यता केंद्राचा उपक्रम स्वागतार्ह

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील : आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्राच्या कोनशिलाचे अनावरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात नव्याने स्थापन केलेल्या 'शिव सहाय्यता केंद्रां'तर्गत 'आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण' केंद्राचा उपक्रम अत्यंत स्वागतार्ह असल्याचे गौरवोद्गार पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी काढले.

विद्यापीठात शिव सहाय्यता केंद्राचे उद्‌घाटन पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठाने शिव सहाय्यता केंद्राच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षणाच्या संदर्भात प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीचा महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला आहे. महापुरासारख्या आपतीच्या क्षणी



कोल्हापूर : 'शिव सहाय्यता' केंद्रांतर्गत आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्राच्या कोनशिलेचे अनावरण करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.

अशा प्रशिक्षित मनुष्यबळाचा शासन व प्रशासनाला निश्चितपणे सकारात्मक उपयोग होत असतो.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापूर, सांगली, सातारा या विभागात यंदा अतिवृष्टीमुळे महापुरासारखे संकट आले. यावेळी झालेले नुकसान पाहता खबरदारी घेण्यासाठी जागृती व आपत्ती व्यवस्थापन नियोजनाच्या मार्गदर्शनासाठी विद्यापीठाने शिव सहाय्यता केंद्रांतर्गत आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली आहे. या केंद्राला, त्याच्या प्रारुप आराखड्याला आणि अनुषंगिक पदनिर्मितीसाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. केंद्राच्या कार्यवाहीसाठी २५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यासही मान्यता दिली आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, राहुल चिकोडे,अमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.